# प्रेसनोट दिनांक १८/११/२०१७

दिनांक १७/११/२०१७ रोजी सायंकाळी ०५/३० वा चे सुमारांस केळेवाडी गल्ली नं २ राजीव गांधी पार्क कोथरुड पुणे याठिकाणी आरोपी नामे निवृत्ती बाळकृष्ण गोरे रा. सुतारदरा कोथरुड पुणे याने फिर्यादी अल्पवयीन मुलीचे घरी जावून, घरामध्ये कोणी नाही हे पाहुन आरोपीने नाबालिक फिर्यादी मुलीस स्वतः जवळ बोलावून घेवून तीचे अंगावरुन हात फिरवून , तीस कॉटवर ढकलुन दिले व नंतर फिर्यादी मुलीचे तोंड दाबुन तीला धरुन तु मला आवडतेस असे म्हणून अंगावरुन हात फिरविला व तीचा विनयभंग केला. फिर्यादी अल्पवयीन मुलीने आरडाओरडा केला असता आरोपी निवृत्ती बाळकृष्ण गोरे हा त्याठिकाणाहुन पळुन गेला. त्यानंतर यातील फिर्यादी/पिडित मुलगी तीचे आई सोबत कोथरुड पोलीस ठाण्यास येवून घडलेला प्रकार सांगुन आरोपी विरुध्द दिलेल्या तक्रारीवरुन कोथरुड पो स्टे येथे गु र नं ४३५/२०१७ भा दं वि क ३५४, ३५४(ब), ५०९ लैंगिक अपराधापासून बालकांचे संरक्षण अधिनियम सन २०१२ चे कलम ११(१) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर गुन्हयाचा तपास मा. पोलीस उप आयुक्त परिमंडळ -२ पुणे श्री बसवराज तेली सो. आणि मा. सहाय्यक पोलीस आयुक्त, डेक्कन विभाग पुणे श्री नाईक सो व कोथरुड पो स्टे चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री रघुनाथ फुगे यांचे मार्गदर्शनाखाली तपास पथकाचे स.पो.फौ.दत्ता शिंदे, पो.हवा.२४३२ वणवे, पो ना कुदळे, पो शि कानवडे, पो शि हगवणे यांनी आरोपी नामे निवृत्ती बाळकृष्ण गोरे रा. सुतारदरा कोथरुड पुणे याचा रात्रभर शोध घेवून त्यास अटक केली आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास महिला सहायक पोलीस निरीक्षक पंचभाई, महिला सहायक पोलीस निरीक्षक ध्रोत्रे व म पो शि भगत, ब न १०७८१ सरके या करीत आहेत.